दिनांक १७/१२/२०२३

## अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १६/१२/२०२३ चे ००.०१ ते २४.०० वा.

### चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिति ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे. नांदगाव पेठ अप.न. ५०९/२०२३ कलम ३७९ भादवी | टोलनाका नांदगाव पेठ पासुन पुढे १०० मिटर अंतरावर नांदगाव पेठ | दि. २८/१०/२०२३ चे १६.३० वा. ते २०.३० वा. दि. १६/१२/२०२३ चे १७.०१ वा. | श्री. आत्माराम तुळशीराम काटकर वय ५३ वर्ष धंदा ड्रायव्हर रा. शहारा ता. लोणार जि. बुलढाना | अज्ञात इसम | हकीकत अशाप्रकारे आहे की पोस्टे. ला जाक्र. आर/सीबी गुन्हा वर्ग २३९४/२०२३ अम. शहर दि. ११/१२/२०२३ अन्वये पोस्टे. वडगाव मावळ येथुन अप क्र. ००/२३ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा डायरी प्राप्त झाल्याने सदर हकीकत अशा प्रकारे यातील फि. हे सह चालक नामे सुरेश अजाबराव गजभिये वय ३४ वर्ष रा.धामनाता.जि.नागपुर सह दि.२८/१२/२३ रोजी त्याचें ताब्यातील अशोक लेलॅन्ड कंटेनर क्र. एम. एच १४ के,ए. ९६३३ हि घेऊन नागपुर येथुन सेफेक्स प्रेस कंपनीचे गोडाऊन मधुन डाक पार्सल सिल केलेला माल भरुन तो साते ता. मावळ जि. पुणे येथे निघाले व नमुद घटनास्थळी फि. हे सहका-या सह जेवनाकरीता केटंनर लावुन थांबले होते जेवन करुन पुढे कंटेनर घेऊन जात असता मागुन येणा-या एका वाहन चालकाने तुमच्या गाडीचे मागील दरवाजे उघडे आहे असे सांगीतले वरुन फि. यांनी गाडी रोड च्या कडेला थांबवुन जाऊन पाहनी केली असता अंधार असल्यामुळे किती माल गेला हे माहीत न पडल्याने गाडी मालक नितीन बबन वारिंगे रा. वारंगवाडी ता. मावळ जि. पुणे यांना फोन केला असता त्यांनी सदर गाडी ही सेफेक्स कंपनी येथे घेऊन जाण्यास सांगीतले सेफेक्स कंपनीच्या मॅनेजर ने तो माल यादीनुसार चेक केला असता १) ३३४४८/- किंमतीचे इनव्हाईस न. डि.ओ.२७२१००१५४८ मधील कॉस्मेटीक मटेरीयल १० बॉक्स. सिलपंक २) ३०२८४१/ रु. किंमतीचे इनव्हाईसन. झेड १२ ३आय ०३९५०३ व इनव्हाईस न. १२-३ आय ०३९७५ मधील मेडीसीन चे सिलपॅक १० बॉक्स असा एकुन ३३६२८९/ रु. चा माल कोणीतरी अज्ञात इसमाने गाडी मागील दरवाजाचे सिल केलेले लॉक तोडुन चोरुन नेला. सदर घटनास्थळ हे नांदगाव पेठ हद्दीतील येत असल्याने पोनि. सा. याचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | पोस्टे राजापेठ अप क्रं. १०२७/२०२३ कलम ३७९ भादवी | अमरावती | दि १६/१२/२३ चे १६/३० वा. ते १७.०० वा. दरम्यान दा. ता. वेळ १६/१२/२३ चे २०.३५ वा. | एक महीला | अज्ञात | हकीकत अश्या प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी त्यांचे परिवारासह हनुमान गढी भानखेडा रोड अमरावती येथे शिवपुराण कार्यक्रमाला गेल्या शिवपुराण कार्यक्रम संपल्यानंतर फिर्यादीचे गळयात मंगळसुत्र होते पेंडॉल मधुन बाहेर निघतांना खुप गर्दी होती फिर्यादी हनुमान गढी कार्यक्रमाचे गेटजवळ आली त्यावेळी गळयाला सहज हात लावला असता त्यांना गळयातील मंगळसुत्र दिसले नाही. त्यांनी त्या गर्दी मध्ये मंगळसुत्र शोधण्याचा प्रयत्न केला परंतु मंगळसुत्र मिळाले नाही . त्यांचे चार वर्षापुर्वी घेतलेले सोन्याचे मंगळसुत्र १३ ग्रॅम वजनाचे कि. अं. ३५,००० रू. हे कोणीतरी अत्रात चोराने शिवपुराण कार्यक्रमाचे पेंडॉल मधुन बाहेर निघतांना कार्यक्रमाचे गेटजवळ येई प्रयंन्त गळयातुन काढुन चोरले आहे. असा फिर्यादीचे जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा DO आदेशाने दाखल |

## वाहन चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे फ्रेजरपुरा अप क्र. १०६१/२०२३ कलम ३७९ भा.द.वी. | भानखेडा रोड कवंरधाचे बाजुला पार्कींग अमरावती शहर | १५/१२/२०२३ चे १९.०० वा ते २०.३० वा.दरम्यान दाखल ता वेळ १६/१२/२०२३ चे १६.१५ वा. | अरुन आत्मराम उपारीकर वय५५ रा.चौर माहुली ता.नांदगाव खंडेश्वर जि.अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील यातील नमुद घटना ता वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी ही त्यांचे नावे असलेली स्पेलंडर प्रो.हिरोकंपनीची मोटर सायकल क्र.एम.एच.२७ बी.एच.-८७६७ ने भानखेडा रोड कवंरधाम हनुमानगढी येथ कलश यात्रा पाहण्याकरीता गेले व त्यांनी त्याची गाडी पार्कींग मध्ये उभी करुन ठेवली.कलश यात्रेचे दर्शन घेवुन घरी जाणेकरीता परत आले असता त्यांनी त्यांची गाडी ज्या ठीकाणी पार्कींग मध्ये ठेवली होती तेथे दिसुन आली नाही आजुबाजुला शोध घेतला मिळुन आली नाही.कोणीतरी अज्ञात चौराने फिर्यादीची गाडी स्पेंलडर प्रो.हिरोकंपनीची मोटर सायकल क्र.एम.एच.२७ बी.एच.-८७६७ कि.अ. २५०००/-रु. चोरुन नेली असावी. अशा फिर्यादीच्या जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## प्राणांतिक अपघात

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे. नांदगाव पेठ अप क्र. ५१० कलम २७९,३३७, ३३८,३०४ अ भादवी १३४ मोवाका | पिपळ विहीर बस स्टॅड जवळ | १६/१२/२०२३ चे ०६.३० वा दाखल १६/१२/२०२३ चे २३.४४ वा | चक्रधर साहेबराव टापरे वय ४८ वर्षे रा. शेदोळा बु. जि. अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्राकरे आहे की फि. यांना फोनव्दारे माहिती मिळाली की फी. यांचा भाऊ अनिल टापरे व त्याची पत्नी यांचा मोटर सायकलने येत असतांना पिपळविहीर जवळ बस स्टड येथे कोणीतरी अज्ञात वाहनाने गाडी क्र. MH २७ BC ७२३८ या मो. सा ला धडक मारुन त्यांचा अपघात केला वरुन जखमी अवस्थेत त्यानी IRB ॲब्युलंसने इर्वीन दवाखान्यात नेले असता तेथील डॉ यांनी फि. यांच्या भावाच्या पतीस मृत घोषीत केले व अनिल टापरे यांची प्रकृती जास्त खराब असल्याने त्यांना रिनस हॉस्पीटल येथे उपचार करीता भरती केले अशा अज्ञात चालकाने त्याचे वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवुन मो. सा. धडक मारुन हर्षा टापरे यांचे मरणास कारणी भुत ठरला अशा फि. यांचे जबानी रिपोर्टवरुन गुन्हा दाखल |

## ईतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०३ | पो.ठाणे नागपुरी गेट अप. क्र ६०८/२०२३ कलम २८३ भादवी | छत्रपती खिडकी चौक अमरावती | दि १६/१२/२०२३ चे १६/३० दाखल १६/१२/२०२३ चे १७/२७ वा | सर तर्फे पोउपनि सुशील कोडापे पो स्टे नागपुरी गेट अमरावती | आदील अहेमद अब्दुल रशीद वय ४० रा. आझाद कॉलनी अम. | हकीकत या प्रमाणे आहे की,यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पो स्टे हद्दीत पेट्रोलींग करित असतांना यातील आरोपी याने आपले ताब्यातील अॅपे लोडींग ऑटो क्र -एम एच ४९ बी. झेड १८६५ हि गाडी सार्वजनिक ठिकाणी आमरोडवर धोकादायक स्थीतीत लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल. अशा स्थितीत आमरोडवर उभा करून रहदारीस अडथळा निर्मान करतांना मिळून आला.सदर आरोपीचे हे कृत्य कलम २८३ भादवी प्रमाने सदरचा गुन्हा दाखल |
| ०४ | पो.स्टे. खोलापुरी गेट अप क्र. २६२/२०२३ कलम ४४८, ४२७,५०४, ५०६(२) भादवी | दहीसाथ सात खिराडी अमरावती | घटना ता.वेळ दि. १६/१२/२०२३ चे २१/०० वा दाखल ता.वेळ दि. १६/१२/२०२३ चे २२/५२ वा | शिवचरण ग्यासीलाल गुप्ता वय - ७१ वर्ष रा. दहीसाथ सात खिराडी अमरावती | अज्ञात दुचाकीस्वार | हकीकत अश्या प्रकारे आहे की आतील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांच्या पत्नीसह त्यांच्या स्वःताच्या किराणा दुकानात बसले असतांना एक एसेस कंपनीची पांढ-या रंगाच्या दुचाकी वाहनावर (नंबर माहीत नाही )वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष काळी टी शर्ट व पांढरा पॅन्ट घातलेला अनोळखी इसम (नाव माहीत नाही) हा फिर्यादीचे दुकानात आला व सुबह किसका झगडा हुआ था असे म्हणुन फिर्यादीचे दुकानातील कांऊटर वर ठेवलेले कॅडबरीज फ्रीज सीसीटीव्ही, टीव्ही चॉकलेट व पेनाची भरणी फेकफाक केली तसेच दुकानाच्या बाहेरील असलेले कुरकुरे व बिस्कीटांची सुध्दा फेकफाक करुन शिवीगाळ करत होता आणि तुम्हारे बच्चे को लाओ उसे मारता काट देता अशी धमकी देत होता.तेव्हा फिर्यादी ने आरडाओरड केली असता यातील आरोपी अनोळखी इसम त्याच्या एसेस गाडीने पळुन गेला. यातील नमुद एसेस गाडीचा चालक त्या अनोळखी इसमाने फिर्यादीच्या दुकानातील सामान कि.अं.७०००/-रु चे नुकसान करुन फिर्यादीला शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली.अश्या फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |